Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

E-Mail- secretary .stateboard @ gmail.com
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 I EPABX -25705000 Secretary(P) : STD . (020)- 25651750

क्र. रा.मं./परीक्षा-८/९६९
पुणे-४११००४
दिनांक -१८/०२/२०२२.
22

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय - कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित केलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी -
१) नियुक्त केलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांना अदा करावयाचा एकवट भत्ता व मानधन.
२) परीक्षा केंद्र व उपकेंद्रांना सॅनिटायझरसाठी तरतूद.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मार्च-एप्रिल २०२२ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षांतर्गत लेखी परीक्षा दि. ०४/०३/२०२२ ते दि. ३०/०३/२०२२ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांतर्गत लेखी परीक्षा दि. १५/०३/२०२२ ते दि. ०४/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था ही त्यांच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील केंद्र/उपकेंद्रावर करण्यात आलेली असल्यांचे आपणांस विदीत आहेच. परिरक्षक केंद्रावरून मुख्य केंद्रांपर्यंत प्रश्नपत्रिकांचे वितरण करणे व अनुषंगिक कामांसाठी प्रचलित पध्दतीने सहाय्यक परिरक्षकांची (रनर) नियुक्ती करून त्यांना या पूर्वीच्या मान्य दराने मानधन देण्यात यावे.

तथापि उपरोक्त परीक्षेसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर केंद्र/उपकेंद्र निश्चित करून बैठक व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे मुख्य परीक्षा केंद्रापासून उप परीक्षा केंद्रापर्यंत प्रश्नपत्रिका नेणे, परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका व अनुषंगिक साहित्य उपकेंद्रावरून मुख्य केंद्रावर घेवून येणे तसेच परीक्षे दरम्यान बैठे पथक म्हणून कामकाज पाहणे यासाठी उपकेंद्रनिहाय स्वतंत्र सहाय्यक परिरक्षकांची नियुक्ती करावयाची आहे. सदर सहा. परिरक्षकांना पुढील तपशीलाप्रमाणे एकवट भत्ता व एकवट मानधन अदा करावयाचे आहे.

१. मुख्य केंद्रापासुन उपकेंद्रापर्यंत प्रश्नपत्रिका घेऊन जाणे, बैठे पथक म्हणून कार्यरत राहणे व परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका मुख्य केंद्रावर जमा करणे इत्यादी साठी नियुक्त करण्यात येणाऱ्या सहाय्यक परिरक्षकास (रनर) संपूर्ण परीक्षा कालावधीसाठी अदा करावयाचा एकवट भत्ता व एकवट मानधन पुढीलप्रमाणे :

एकवट भत्ता :

| मुख्य केंद्रापासून उपकेंद्रांचे अंतर (कि.मी.)/ उपकेंद्राचे क्षेत्र (शहरी / ग्रामीण) | ३ कि.मी. पर्यंत | ३ कि.मी. पेक्षा अधिक ते ६ कि.मी.पर्यंत | ६ कि.मी. पेक्षा अधिक ते ८ कि.मी.पर्यंत | ८ कि.मी.पेक्षा अधिक |
|---|---|---|---|---|
| शहरी | रु.६००/- | रु.८००/- | रु.९००/- | रु.१०००/- |
| ग्रामीण | रु.५००/- | रु.७००/- | रु.८००/- | रु.९००/- |

टिप- मुख्य केंद्रामध्ये समाविष्ठ असलेल्या उपकेंद्राला उपरोक्त भत्ता देय असणार नाही.

एकवट मानधन :

| मुख्य केंद्र/उपकेंद्रावरील परीक्षार्थ्यांची संख्या | १०० पर्यंत | १०१ ते ३०० पर्यंत | ३०१ ते ६०० पर्यंत | ६०० पेक्षा अधिक |
|---|---|---|---|---|
| एकवट मानधन | रु.३००/- | रु.४००/- | रु.५००/- | रु.६००/- |

२. परीक्षा केंद्र/ उपकेंद्रावरील परीक्षार्थींना स्वतःचा सॅनिटायझर सोबत आणणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि परीक्षा केंद्राच्या प्रवेशव्दाराजवळ सॅनिटायझर उपलब्ध करून देण्यात यावे. त्यासाठी पुढीलप्रमाणे एकवट खर्च अनुज्ञेय राहील. सदर खर्चाचा तपशील व देयक केंद्र खर्चाच्या हिशेब पुस्तिकेत समाविष्ट करण्यात यावा.

| मुख्यकेंद्र/उपकेंद्रावरील परीक्षार्थ्यांची संख्या | १०० पर्यंत | १०१ ते ३०० पर्यंत | ३०१ ते ६०० पर्यंत | ६०० पेक्षा अधिक |
|---|---|---|---|---|
| एकवट अनुज्ञेय खर्च | रु.३००/- | रु.४००/- | रु.५००/- | रु.६००/- |

उपरोक्त बाबींसह प्रचलित अन्य बाबींचा खर्च संबंधित लेखाशिर्षांतर्गत करण्यात यावा.

सदर सूचना इ. १० वी व इ. १२ वी च्या केंद्र/उपकेंद्रसंचालक तसेच परिरक्षक यांना लेखी स्वरूपात निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ,पुणे.

---

क्र.मुंविमं./लेखा–१–२/ 3038
नवी मुंबई ४०० ७०३
दिनांक –02/03/२०२२

प्रति,

मुख्य परिरक्षक/मुख्य केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक
जिल्हा–मुंबई/ठाणे/रायगड/पालघर

विषय: कोविड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर मार्च–एप्रिल २०२२मध्ये आयोजित केलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ १० वी) परीक्षेसाठी–
१) नियुक्त केलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांना अदा करावयाचा एकवट भत्ता व मानधन
२) परीक्षा केंद्र व उपकेंद्राना सॅनिटाझरसाठी तरतूद

संदर्भ : राज्य मंडळाचे पत्र क्र रा.मं./परीक्षा–८/९६६ दि २२/०२/२०२२ चे पत्र

आपणास कळविण्यात येते की, सदर राज्य मंडळाचे संदर्भिय विषयाकिंत पत्रानुसार खर्चाची कार्यवाही करण्यात यावी.

( डॉ सुभाष बोरसे )
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३